

गणपती बाप्पा सजावट स्पर्धा
चला तर मग...
स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपल्या घरातील गणपती बाप्पा सजावटीचा सेल्फी फोटो काढा 9881265102 या मो.क्रमांकावर वाटसप करा...
पर्यावरण पूरक व आकर्षक सजावटीला दैनिकात प्रसिद्ध तर मिळणारच पण एक योग्य बक्षीस मिळवा

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# परळी संघर्षनेता

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ निर्विघ्नं कुरुमे देव सर्वकार्येषु सर्वदा

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

वर्षे- 10 वे | अंक क्र. 233 शनिवार दि. 06 सप्टेंबर 2025 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060

# कुणबी नोंद शोधली म्हणून लगेच जात प्रमाणपत्र मिळणार नाही!

» ओबीसी उपसमिती अध्यक्षांच्या वक्तव्याने वाढला संभ्रम



मनोज जरांगे यांच्या मागणीवरुन हैदराबाद गॅझेटमध्ये मराठा-कुणबी अशी नोंद आढळल्यास त्याला कुणबी प्रमाणपत्रे देण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. आता सर्वच मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळेल, असा दावा जरांगे यांच्यावतीने केला जात आहे. दुसरीकडे शासनाने काढलेला जीआर हे फक्त माहिती पत्रक असल्याचाही दावा केला जात आहे. यावरुन सर्वत्र संभ्रम निर्माण झाला असताना राज्याचे महसूल मंत्री आणि ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्याने आणखीच गोंधळ निर्माण झाला आहे.कोणी नोंद शोधली म्हणून त्या आधारावर सर्टिफिकेट मिळणार नाही, असे विधान बावनकुळे यांनी केले आहे. मराठा आरक्षणावरुन जरांगे आणि ओबीसीचे आंदोलन, राज्य शासनाने काढलेला जीआर, मुख्यमंत्र्यांनी ओबसींना दिलेले आश्वासन, छगन भुजबळ यांनी व्यक्त केलेली नाराजी, आदी मुद्द्यांवर बावनकुळे यांनी भाष्ट केले आहे.बावनकुळे म्हणाले, कोणी जुन्या दस्तावेजामध्ये नोंदणी शोधली म्हणून त्या आधारावर सर्टिफिकेट मिळणार नाही, अधिकारी हे सर्व कागदपत्रे तपासतील, नियमाप्रमाणे स्वाक्षरी करतील, एवढेच नव्हे तर कुठल्याही जात प्रमाणपत्राला आव्हान देता येऊ शकते, असेही ते म्हणाले. छगन भुजबळ हे नाराज नाहीत. त्यांचे काही आक्षेप आणि संभ्रम आहेत. ते आम्ही दूर करू. त्यांचा आक्षेप नेमक्या कुठल्या शब्दावर हे तपासून घेतले जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.ओबीसीची उपसमितीचे सर्व सदस्यांची बैठक मंगळवारी आणि बुधवारी घेण्यात येईल. यावेळी व्यापक चर्चा करणार असल्या पान 3 वर

## आज ठळक

### माजलगावच्या महाराजाला भाविकांचा मोठा मान !



माजलगाव, : माजलगाव शहराचा महाराजा म्हणून ओळखला जाणारा, निजामकालीन परवानगी ऐतिहासिक टेंबे गणपती उत्सव यंदाही भक्ती-श्रद्धेच्या वातावरणात सुरु झाला आहे. स्थापनेच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी तब्बल पावणेदोन किलो चांदीचे दागिने श्रीचरणी अर्पण करुन गणरायाविषयी अस लेली अखंड भक्ती व श्रद्धा व्यक्त केली.टेंबे गणपती हा माजलगाव शहराचा पारंपरिक व ऐतिहासिक गणपती मानला जातो. निजामशाही काळात याला औपचारिक परवानगी मिळाल्यामुळे हा गणपती राजसत् तसेच ाच्या छत्रछायेखाली साजरा होण-असलेला ारा एकमेव उत्सव ठरला. त्या काळापासून आजतागायत अखंड परंपरा अबाधित राहिली असून हा उत्सव शहरातील धार्मिक व सांस्कृतिक ऐक्याचा दुवा बनला आहे. यंदाच्या उत्सवात गाणगापूर दत्तमंदिर व तिरुपती बालाजी मंदिराचा आकर्षक देखावा उभारण्यात आला आहे. तीन दिवसीय गणेशयाग, महिलांचे सामूहिक भजन, तसेच आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर यांसारखे उपक्रम गणेशोत्सवात रंगतदार ठरणार आहेत.त्सवाच्या पहिल्याच दिवशी श्रीचरणी पावणेदोन किलो चांदीचे दागिने अर्पण पान 3 वर

## तुझी इतकी हिंमत, मी ॲक्शन घेईन महिला अधिकाऱ्यावर अजित पवार भडकले



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या थेट, बेधडक विधानांसाठी आणि शिस्तप्रिय नेते म्हणून प्रसिद्ध आहे. याच अजित पवारांचा सध्या एक पान 3 वर

## केजमध्ये पोलिसांचा थरार; अचानक 'अश्रुधुर' आणि 'फायरिंग'!



केज : केज शहरात पोलिसांसह दंगल नियंत्रक पथक शुक्रवारी (दि.5) सायरन वाजवित दाखल झाले. त्यानंतर त्यांनी हॅन्डग्रेड व अश्रुधुराचे नळकांडे काढून त्याचे हवेत फायर करायला सुरुवात केली. हा नेमका प्रकार काय सुरु आहे? याची माहिती नागरिकांना नव्हती. त्यामुळे नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले.याबाबत माहिती अशी की, सध्या गणेशाचे विसर्जन आणि ईद- -ए-मिलादच्या अनुषगांने पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. दरम्यान पोलिसांचा तगडा बंदोबस्त शहरात दाखल झाला असून दंगल नियंत्रण पथक आणि त्यांच्या मदतीला गृहरक्षक दल देखील तत्पर आहे. पान 3 वर

## त्रिपुरा राज्याचे सचिव मा. श्री किरण गित्ते साहेब IAS यांच्यावर देशभरातुन शुभेच्छांचा वर्षाव !





परळी (प्रतिनिधी) परळीचे भूमिपुत्र तथा त्रिपुरा राज्याचे सचिव : सार्वजनिक बांधकाम, उद्योग, कुटुंब कल्याण ,वाणिज्य, माहिती तंत्रज्ञान ,पर्यटन विभागाचे यांचा वार शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात त्रिपुरा येथील माता त्रिपुरा सुंदरी दर्शन घेऊन आरती पुजा करुन शासकीय निवासस्थानी त्रिपुरा येथे त्रिपुरा राज्यातील सहकारी मित्र परिवारा तील कुटुंबातील सर्व सदस्यांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.

परळीचे भूमिपुत्र मा श्री किरण गित्ते साहेब IAS सचिव: त्रिपुरा सरकार यांच्यावर वाढदिवसानिमित्त परळी, अंबाजोगाई पान 3 वर


## जरांगेंच्या आंदोलनाला पवार कुटुंबीयांची रसद' हे वक्तव्य चुकीचे; हर्षवर्धन पाटील यांचे मत



बीड : मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या उपोषणावर राज्य सरकारने काढलेला आदेश आरक्षणाच्या संदर्भाने काढलेला मार्गदर्शक आराखडा (रोड मॅप) आहे. आदेशामध्ये ओबीसीमध्ये समाविष्ट केल्याचे कुठेही नमूद पान 3 वर




## नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री. प्रदिपजी खाडे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



परळी वै.(प्रतिनिधी) दि:4 सप्टेंबर 2025नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री.प्रदिपजी खाडे साहेब यांचा वाढदिवस मिलिंद माध्यमिक विद्यालयात विविध सहशालेय उपक्रम घेऊन, क्रिडा साहित्य व शैक्षणिक साहित्य वाटप करुन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक प्राचार्य श्री. अतुल दुबेसर,मिलिंद ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य श्री.व्ही. एन.शिंदेसर, मिलिंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. भाऊसाहेब कदरकर सर, उप-प्राचार्य श्री.शेख इरफान सर, पान 3 वर

## माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी घेतले प्रभु वैद्यनाथांचे दर्शन

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून स्वागत





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे आज दिनांक 05 सप्टेंबर रोजी एका खाजगी कार्यक्रमानिमित्त अंबाजोगाई येथे आले असता, त्यांनी आवर्जून परळी वैजनाथ येथे येऊन प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन घेतले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे शुक्रवार दिनांक 05 सप्टेंबर रोजी परळी वैजनाथ दौऱ्यावर आले असता त्यांनी प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा परिषदेचे पान 3 वर

## शिक्षक म्हणजे मार्गदर्शक, प्रेरणास्त्रोत आणि समाजाचा खरा शिल्पकार – दीपक तांदळे

### संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात शिक्षक दिन उत्साहात साजरा



परळी (प्रतिनिधी) – शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात शिक्षक दिन अत्यंत उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर आनंद होता, तर शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा उत्साह सर्वत्र जाणवत होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलासजी तांदळे साहेब (अध्यक्ष, पान 3 वर

## जिल्हाधिकाऱ्यांचा महसूल विभागात कारवाईचा बडगा



बीड, पुढारी वृत्तसेवा बीड जिल्ह्यात महसूल विभागात कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी थेट शिस्तभंगाची कारवाई करताच विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे. केवळ एका आठवड्यात जिल्ह्यातील चार महसूल कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली असून यामुळे कर्मचारी वर्गात तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांत गेवराई तहसील कार्यालयातील सहायक पान 3 वर

संपादकीय

# भाजप सत्तेत आली खरी, पण अजूनही सैरभैरच

महाराष्ट्रात चालू वर्षी भाजप पुन्हा सत्तेत आली आहे. पण ही सत्ता त्यांना जनतेच्या निर्विवाद पाठिंब्यामुळे मिळालेली नाही, तर तडजोडी, सौदेबाजी आणि स्वार्थी राजकारणाच्या गणितातून मिळालेली आहे. म्हणजे सत्ता आली खरी, पण आत्मविश्वास हरवला आहे. जिथे एकेकाळी भाजप एकहाती बहुमताचा दावा करत होती, तिथे आज त्यांना सोबती घेतल्याशिवाय सरकार बनवता आलेले नाही.

सत्ता गमावण्याचा पाच वर्षांपूर्वीचा धक्का भाजप अजूनही विसरलेली नाही. आज त्यांचे नेते सत्तेत बसले आहेत, पण मनात मात्र भीती आणि असुरक्षितता आहे. कारण जनतेने त्यांना पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत देऊन विश्वास दाखवला नाही. जनता संशयाने पाहते आहे, आणि भाजप आतून हादरलेली आहे.

कालपर्यंत भाजप ज्या पक्षांना भ्रष्ट, दिशाहीन, संधीसाधू म्हणत होती, त्यांच्याच गळ्यात हार घालून आज ती सत्तेवर आली आहे. हीच भाजपची खरी अधोगती आहे. विरोधी पक्षात असताना काँग्रेसवर आरोप करताना त्यांनी "तडजोडीच्या राजकारणा"वर भाषणं ठोकली, पण आज ते स्वतः त्याच दलदलीत शिरलेत. जनता मूर्ख नाही; लोकांना हे दुटप्पी राजकारण चांगलेच लक्षात येते.

सत्तेत असतानाही भाजप नेत्यांची वाणी खालच्या पातळीवर घसरलेली आहे. त्यांना स्वतःच्या यशापेक्षा भागीदारांचा पाठिंबा जपणे महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळे आक्रमक भाषणांचा दम गेला आहे, निर्णयक्षमता ढासळली आहे. महाराष्ट्रात आज भाजप सरकार आहे, पण नेतृत्वाचा आत्मविश्वास हरवलेला आहे.

भाजपने स्वतःची विचारसरणी बाजूला ठेवली आणि केवळ सत्तेसाठी सारे मार्ग खुले केले. जनतेने यालाच "स्वार्थासाठी सत्ता" असे ओळखले आहे. म्हणूनच लोक मनातल्या मनात भाजपकडे संशयाने पाहत आहेत. कारण जिथे तत्वांचा सौदा केला जातो, तिथे टिकाऊ सत्ता कधीच उभी राहत नाही.

म्हणूनच असे म्हणावे लागते — भाजप पुन्हा सत्तेत आली खरी, पण अजूनही ती सैरभैर आहे. सत्ता आली तरी विश्वास बसलेला नाही, आणि पाच वर्षांपूर्वीचा पराभव त्यांच्या मनात अजूनही खोलवर रुतून बसलेला आहे.

# महाराष्ट्रातील सागरी सामर्थ्यात वाढ: देशातील सर्वात मोठा कंटेनर टर्मिनल सुरू

डॉ. भारत कऱ्हाड

महाराष्ट्राच्या सागरी व्यापार क्षेत्रात दि. 04 सप्टेंबर, 2025 रोजी ऐतिहासिक टप्पा पार झाला आहे. नवी मुंबईजवळील प्रमुख बंदरावर देशातील सर्वात मोठा कंटेनर टर्मिनल सुरु झाला असून, यामुळे महाराष्ट्राला समुद्री क्षेत्रातील महत्त्वपूर्ण महासत्ता बनवण्याच्या दिशेने मोठा प्रगतिशील पाऊल उचलले गेले आहे. या टर्मिनलच्या उद्घाटनामुळे देशातील सागरी पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून, राज्याची जागतिक पुरवठा साखळीतील भूमिका ठळक होणार आहे.

टर्मिनलच्या विस्तारामुळे वार्षिक हाताळणी क्षमता आधीच्या 2.4 दशलक्ष टीईयूपासून दुप्पट होऊन 4.8 दशलक्ष टीईयू (Twenty-foot Equivalent Units) झाली आहे. घाटाची लांबी 2000 मीटरपर्यंत वाढवण्यात आली असून, आधुनिक 24 घाट क्रेन आणि 72 रबर-टायर्ड गॅन्ट्री क्रेन (आरटीजी) यांचा समावेश करण्यात आला आहे. संपूर्ण टर्मिनल 100% अक्षय ऊर्जेवर कार्यरत असून, पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

हा टर्मिनल देशातील पहिले असे कंटेनर हब आहे जे समर्पित फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) अनुरूप तयार केले गेले आहे. यामुळे रस्ते आणि रेल्वे मार्गांमार्फत देशातील 63 हून अधिक इनलँड कंटेनर डेपो (ICD) शी जोडणी झाली आहे. या विस्तृत मल्टीमॉडल नेटवर्कमुळे कंटेनर वाहतूक जलद, कार्यक्षम आणि सुरक्षित होईल. औद्योगिक केंद्रे, बंदर आणि लॉजिस्टिक हब आपसात सुसंगतपणे जोडले जातील, ज्यामुळे उत्पादन, वितरण आणि निर्यात प्रक्रियेतील वेळ आणि खर्च कमी होईल.



नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री

महाराष्ट्रामध्ये सध्या दोन प्रमुख कंटेनर टर्मिनल्स आहेत – जेएनपीटी (नवी मुंबई) आणि मुंबई पोर्ट. याशिवाय, राज्यात अनेक लहान आणि मध्यम आकाराचे बंदरही कार्यरत आहेत, जसे की दाभोल, जैगड, विजयदुर्ग, रेवदांडा, डहाणू, तारापूर, नवापूर, सटपटी, वासल, वर्सोवा आणि मणोरी. या सर्व टर्मिनल्स राज्याच्या सागरी सामर्थ्यास भर घालतात आणि स्थानिक तसेच क्षेत्रीय मालवाहतुकीस महत्त्वपूर्ण योगदान देतात.

सागरी व्यापार क्षेत्राच्या या विस्तारीकरणामुळे रोजगार निर्मितीला देखील चालना मिळेल. अंदाजे 5,000 थेट आणि 15,000 अप्रत्यक्ष रोजगार या टर्मिनलमुळे निर्माण होऊ शकतात. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेत गतिशीलता येईल, तर कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणासाठी संधी वाढतील. वाहनचालक, क्रेन ऑपरेटर, सुरक्षा कर्मचारी, माहिती तंत्रज्ञान सहाय्यक आणि प्रशासन यांसारख्या क्षेत्रात स्थानिक लोकांसाठी संधी उपलब्ध होतील.

तांत्रिक दृष्टिकोनातून, हा टर्मिनल अत्याधुनिक साधनसामग्रीसह सज्ज आहे. आयसीटी प्रणाली, ऑटोमेटेड कंटेनर मॅनेजमेंट, डिजिटल लॉजिस्टिक्स ट्रॅकिंग आणि स्मार्ट सॉफ्टवेअर वापरून कंटेनर हाताळणी प्रक्रिया जलद, सुरक्षित आणि अचूक केली जाते. हे उपकरणे मानवी चुका कमी करतात, कार्यक्षमता वाढवतात आणि व्यापारी व्यवहार अधिक विश्वासार्ह करतात.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून, टर्मिनल पूर्णपणे अक्षय ऊर्जा आणि हरित तंत्रज्ञानावर आधारित आहे. यामध्ये कमी कार्बन उत्सर्जन, ऊर्जा बचत, जलसंधारण, पुनर्वापर आणि प्रदूषण नियंत्रण उपाययोजना केलेल्या आहेत. अशा प्रकारे, टर्मिनल पर्यावरणपूरक असून, सागरी व्यापार टिकाऊ आणि स्थिर स्वरूपात विकसित होईल.

आर्थिक आणि व्यापारिक दृष्टिकोनातून, हा टर्मिनल राज्य आणि देशासाठी मोठा लाभ ठरेल. टर्मिनलची वाढलेली क्षमता, 4.8 दशलक्ष टीईयू, निर्यातदारांना जलद सेवा उपलब्ध करेल, आयात प्रक्रियेत सुधारणा होईल आणि जागतिक पुरवठा साखळीमध्ये भारताची स्पर्धात्मक क्षमता वाढेल. यामुळे विदेशी गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि स्थानिक उद्योग यांना चालना मिळेल.

विशेष आकडेवारी:

वार्षिक हाताळणी क्षमता: 4.8 दशलक्ष टीईयू

घाटांची लांबी: 2000 मीटर

घाट क्रेन: 24

रबर-टायर्ड गॅन्ट्री क्रेन (RTG): 72

इनलँड कंटेनर डेपो (ICD)शी जोडणी: 63+

रोजगार निर्माण: थेट – 5,000; अप्रत्यक्ष – 15,000+

महाराष्ट्रातील प्रमुख कंटेनर टर्मिनल्स: जेएनपीटी, मुंबई पोर्ट

लहान-मध्यम बंदर: दाभोल, जैगड, विजय दुर्ग, रेवदांडा, ड हाणू, तारापूर, नवापूर, सटपटी, वासल, वर्सोवा, मणोरी

भविष्यात, महाराष्ट्रामध्ये वाढवण पोर्ट सारख्या प्रकल्पांद्वारे जागतिक दर्जाचे बंदर विकसित करण्याची योजना आहे, ज्यामुळे राज्याची सागरी सामर्थ्य अजून वाढेल. या टर्मिनल्सच्या माध्यमातून महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीमध्ये अग्रगण्य भूमिका बजावेल आणि भारताच्या सागरी अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देईल.

सारांश: महाराष्ट्रातील या टर्मिनल्स आणि विस्तारामुळे राज्याच्या सागरी सामर्थ्याची प्रत्यक्ष माहिती मिळते. आधुनिक तंत्रज्ञान, मोठी हाताळणी क्षमता, बहुआयामी नेटवर्क, रोजगार निर्मिती आणि पर्यावरणपूरक उपाययोजना यामुळे महाराष्ट्र पुढील शंभर वर्षांसाठी सागरी व्यापारात अग्रगण्य स्थानावर राहील.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

## अभिनव गणेश फेस्टिव्हलमध्ये श्री गणेशाची आरती संस्थेची सचिव परळी भूषण साहेबराव फड यांच्या शुभहस्ते संपन्न



परळी .प्रतिनिधी . ज्ञान प्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव विद्यालय नेहरू चौक परळी येथे अभिनव गणेश फेस्टिवल अंतर्गत श्री गणेशाची आरती संस्थेचे सचिव परळी भूषण साहेबरावजी फड यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व सर्व विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते श्री गणेशाच्या आरतीनंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद म्हणून फळ वाटप करण्यात आले .

## माणिक नगर गणेश मंडळाच्या वतीने होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात संपन्न



शहरातील माणिक नगर गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा महिलांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी होम मिनिस्टर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेस परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यावेळी होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांसाठी विविध खेळ घेण्यात आले. युवती पासून वयोवृद्ध महिला यामध्ये सहभागी होत खेळांचा आनंद घेतला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य यांनी परिश्रम घेतले.

परळी वैजनाथ दि.05 (प्रतिनिधी)शहरातील माणिक नगर गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाही विविध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. गुरुवारी (ता.04) सायंकाळी महिला भगिनींसाठी होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या मध्ये महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.




# समान परिस्थिती, वेगळा न्याय : महाराष्ट्रातील बंजारा समाज अनुसूचित जमाती (S.T.) आरक्षणाचा हक्कदार

 ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि राज्य पुनर्रचनेतील अन्याय :

भारतातील बंजारा, गोर बंजारा अथवा लमाण, लमाणी समाज हा पूर्वीपासूनच वंचित, पीडित व सतत स्थलांतरित जीवन जगणारा समुदाय राहिलेला आहे. या समाजाचा मागोवा घेतला तर निजामशाहीच्या काळातही त्यांच्या अस्तित्वाची स्पष्ट नोंद सरकारी गॅझेटमध्ये दिसून येते. निजामाच्या हैदराबाद संस्थानातील अधिकृत नोंदींमध्ये बंजारा समाजाला स्वतंत्र जमात म्हणून मान्यता होती. त्याचप्रमाणे तत्कालीन ब्रिटिश सरकारच्या अहवालांत व विविध जिल्ह्यांच्या गॅझेट नोंदींमध्येही या समाजाचा उल्लेख अनुसूचित व मागासवर्गीय म्हणून केला गेला आहे. म्हणजेच, बंजारा समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची मागासलेपणाची जाणीव तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनाही होती, हे निर्विवादपणे सिद्ध होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1950 मध्ये भारतीय संविधानाची अंमलबजावणी झाली. त्यातील कलम 366(25) व अनुसूची 342 अंतर्गत अनुसूचित जमातींची यादी जाहीर करण्यात आली. या यादीत तत्कालीन हैदराबाद संस्थानाचा भाग असलेल्या आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यात बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती ( S.T.) प्रवर्गात करण्यात आला. आजही त्या राज्यांत बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळतो. याउलट, महाराष्ट्रात मात्र राज्य पुनर्रचनेच्या प्रक्रियेदरम्यान मोठा अन्याय घडला.

1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा मराठवाडा विभाग हा हैदराबाद संस्थानाचा भाग म्हणून महाराष्ट्रात सामील झाला. राज्य पुनर्रचनेच्या या प्रक्रियेत, इतर राज्यांत अनुसूचित जमाती म्हणून मान्यता असलेला बंजारा समाज महाराष्ट्रात मात्र 'विमुक्त जाती अ' प्रवर्गात टाकण्यात आला. हा निर्णय पूर्णतः विसंगत व अन्यायकारक होता. कारण सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती सारखी असूनही, शेजारील राज्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळतो, आणि महाराष्ट्रातील बंजारा समाज मात्र त्याच अधिकारापासून वंचित राहतो.

ही विसंगती संविधानातील समानता तत्त्वाच्या (Equality Principle – कलम 14 व 15) स्पष्ट उल्लंघनासमान आहे. एकाच समाजाला, एकाच वंशपरंपरेला, वेगवेगळ्या राज्यांत वेगळा दर्जा देणे हे सामाजिक न्यायाच्या मूलभूत संकल्पनेलाही बाधक आहे. "समता हीच खरी लोकशाहीचा आत्मा आहे" असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते, परंतु बंजारा समाजाच्या प्रश्नाकडे मात्र शासनाने व कायदेमंडळाने पूर्णपणे दुर्लक्ष केले.

आज महाराष्ट्रातील बंजारा समाज या ऐतिहासिक अन्यायाच्या छायेत जगत आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रश्न अजूनही तेवढ्याच तीव्र आहेत, जितके इतर राज्यांतील बंजारा समाजाचे होते. परंतु आरक्षणातील अन्यायामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला प्रगतीची दारे बंद झाली. त्यामुळेच या प्रश्नाचा ऐतिहासिक संदर्भ, घटनात्मक तरतुदी व सामाजिक स्थिती लक्षात घेऊन समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देणे अपरिहार्य ठरते.

 शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वातील मागासलेपणा :

महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या शैक्षणिक स्थितीकडे पाहिले तर ती अत्यंत चिंताजनक व मागासलेली आहे. आजही ग्रामीण व दुर्गम भागात या समाजातील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षणाची सुविधा अपुरीच आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, बंजारा समाजातील साक्षरता दर महाराष्ट्रात केवळ सुमारे 52 टक्क्यांच्या आसपास आहे, तर राज्याचा सरासरी साक्षरता दर 82 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. उच्चशिक्षणाच्या दृष्टीने ही तफावत अधिकच गंभीर ठरते. महाविद्यालयीन शिक्षणात बंजारा समाजाचा प्रवेश अत्यल्प असून अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमात तर हा आकडा नगण्य आहे. अनुसूचित जमातींना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक आरक्षणाचा लाभ न मिळाल्यामुळे या समाजातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे स्वप्न दहावी-बारावी नंतरच थांबते.

रोजगाराच्या क्षेत्रातही बंजारा समाजाला प्रचंड वंचितपणाचा सामना करावा लागतो. राज्यातील बहुतांश बंजारा युवक पारंपरिक हातमजुरी, शेतमजुरी, लहान-मोठे धंदे किंवा स्थलांतरित मजुरीवर अवलंबून असतात. शासकीय नोकऱ्यांमध्ये या समाजाचे प्रमाण अत्यल्प असून, तेही ओबीसी प्रवर्गातील स्पर्धेमुळे मागे पडते. महाराष्ट्र सरकारच्या कर्मचारी आकडेवारीनुसार, गट-अ आणि गट-ब पदांवर बंजारा समाजाचे प्रतिनिधित्व जवळजवळ नगण्य आहे. गट- क आणि गट-ड मध्ये काही प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या असल्या तरी त्या टिकाव धरु शकलेल्या नाहीत. याउलट, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटकात अनुसूचित जमाती आरक्षणामुळे बंजारा समाजातील मोठा वर्ग शासकीय सेवेत पोहोचला असून, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या प्रगती करत आहे.

राजकीय प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने बंजारा समाज महाराष्ट्रात नेहमीच उपेक्षित राहिला आहे. अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या मतदारसंघांत या समाजाला उमेदवारी मिळत नाही, कारण त्यांना ओबीसीमध्ये गणले जाते. दुसरीकडे, ओबीसी प्रवर्गातील प्रमुख जातींच्या राजकीय वर्चस्वामुळे बंजारा समाजाचे नेतृत्व दुय्यम ठरते. त्यामुळे विधानमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा संसदेत समाजाचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. "लोकशाही ही संख्येवर नाही तर प्रतिनिधित्वावर उभी असते" असे म्हटले जाते, परंतु बंजारा समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

या शैक्षणिक, रोजगार व राजकीय वंचितपणाचे मूळ कारण म्हणजे समाजाला अनुसूचित जमातींचा दर्जा न मिळणे हे होय. कारण राज्यघटनेतील कलम 46 नुसार, अनुसूचित जाती व जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे विशेष रक्षण करण्याची जबाबदारी राज्यावर टाकलेली आहे. परंतु महाराष्ट्रातील बंजारा समाज या संरक्षणापासून वंचित आहे. "समाजाच्या सर्वांत दुर्बल घटकांना बळकट केल्याशिवाय खरी लोकशाही फुलू शकत नाही" हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आजही तितकाच लागू होतो.

 न्यायालयीन लढा, आयोगांचे अहवाल व धोरणात्मक शिफारसी :

महाराष्ट्रातील बंजारा समाजाने अनुसूचित जमाती प्रवर्गातील हक्क मिळविण्यासाठी गेली अनेक दशके न्यायालयीन आणि प्रशासकीय स्तरावर लढा दिला आहे. 1950 मध्ये भारतीय संविधान लागू झाल्यावर तत्कालीन हैदराबाद राज्याच्या गॅझेटमध्ये बंजारा/लंबाडी/सुगाळी समाजाचा समावेश अनुसूचित जमाती यादीत होता. परंतु 1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्यानंतर मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाला आणि नवीन तयार झालेल्या बॉम्बे राज्याने अनुसूचित जमातींची यादी तयार करताना बंजारा समाजाला वगळले. याविरुद्ध समाजाने आंदोलन, निवेदने, खटले अशा विविध मार्गांचा अवलंब केला.

न्यायालयीन स्तरावर पाहिले तर, बंजारा समाजाचे अनेक खटले मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले. यामध्ये समाजाने हेच अधोरेखित केले की, "राज्याचे पुनर्रचनेनंतर फक्त प्रशासकीय सीमा बदलल्या, पण समाजाचे सामाजिक-आर्थिक वास्तव तेच राहिले. त्यामुळे हैदराबादमधील ST दर्जा महाराष्ट्रातही कायम राहायला हवा होता." न्यायालयांनी काही ठिकाणी राज्य व केंद्र सरकारला समाजाच्या मागणीचा गांभीर्याने विचार करण्याचे निर्देश दिले असले तरी, अद्याप अंतिम तोडगा निघालेला नाही.

विविध आयोगांच्या अहवालांमध्येही बंजारा समाजाच्या मागणीस आधार मिळतो. खास करून मंडल आयोग (1980) यांनी बंजारा समाजाच्या मागासलेपणाचे सविस्तर वर्णन केले होते. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने (काका काळेलकर व नंतरचे आयोग) देखील बंजारा समाजाच्या सामाजिक-शैक्षणिक मागासलेपणाची नोंद केली आहे. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने (2010, 2015) केंद्र सरकारला सादर केलेल्या अहवालांमध्ये, "समान समाजाला एका राज्यात ST आणि दुसऱ्या राज्यात OBC/VJNT मध्ये टाकणे हे संविधानातील समानतेच्या तत्त्वाला विरोधी आहे" असे नमूद केले आहे.

धोरणात्मक स्तरावर पाहता, महाराष्ट्र सरकारने अनेक वेळा केंद्र सरकारला बंजारा समाजाच्या ST दर्जासाठी शिफारस केली आहे. 2008, 2013 मध्ये राज्य मंत्रिमंडळाने ठराव पारित करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला होता. परंतु केंद्र सरकारकडून "संपूर्ण देशभर एकसमान धोरण" या कारणावरून तो प्रस्ताव अजूनही प्रलंबित ठेवण्यात आला आहे. दुसरीकडे, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या राज्यांमध्ये बंजारा समाज आजही ST प्रवर्गात आहे आणि तिथे त्यांना शैक्षणिक, रोजगार व राजकीय लाभ मिळत आहेत.

न्यायालयीन आणि आयोगांच्या निष्कर्षांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बंजारा समाजाची मागणी ही केवळ भावनिक किंवा राजकीय नाही, तर घटनात्मक व न्यायसुसंगत आहे. राज्यघटनेतील कलम 14 (समानतेचा हक्क) आणि कलम 15(4), 16(4) (आरक्षणाच्या तरतुदी) याच्या आधारे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही अनुसूचित जमाती प्रवर्गाचा हक्क मिळणे अपरिहार्य आहे. "ज्या समाजाला इतिहासाने वंचित केले, त्याला भविष्याने संधी द्यावी" हा न्यायनिवाड्याचा मूलभूत विचार आजही लागू होतो.


 निष्कर्षात्मक सारांश :

महाराष्ट्रातील बंजारा समाजावर झालेला ऐतिहासिक अन्याय केवळ प्रशासकीय निर्णयाचा परिणाम आहे, समाजाच्या सामाजिक-आर्थिक वास्तवाचा नव्हे. निजामशाही काळात व नंतर हैदराबाद राज्यात बंजारा समाजाला अनुसूचित जमाती म्हणून मान्यता होती. 1956 च्या राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावर या समाजाचा ST दर्जा काढून टाकण्यात आला आणि त्यांना VJ/NT प्रवर्गात टाकण्यात आले. परिणामी, शैक्षणिक आरक्षण, शासकीय नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्व क्षेत्रात समाजाची पिढ्यान्पिढ्या हानी झाली आहे. समान सामाजिक-आर्थिक स्थितीत असताना शेजारच्या आंध्र प्रदेश, तेलंगणा S.T. आणि कर्नाटकातील बंजारा समाज SC म्हणून प्रगत होत असताना महाराष्ट्रातील बंजारा समाज मागे राहिला आहे.

घटनात्मक दृष्ट्या ही परिस्थिती कलम 14 (समानतेचा हक्क), कलम 15(4) व 16(4) (आरक्षणाची तरतूद) आणि कलम 46 (मागासवर्गीयांच्या हितसंरक्षणाची जबाबदारी) या तरतुदींना विरोधी ठरते. संविधानाने दिलेले समान हक्क एका समाजाला फक्त राज्यांच्या सीमांच्या आधारावर हिरावून घेणे हे अन्यायकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा ठरवले आहे की, आरक्षण व प्रतिनिधित्वाचा उद्देश "सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे" हा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही ST दर्जा देणे हेच न्यायसंगत ठरते. किंबहुना तो कायदेशीर हक्क ठरतो.

आज बंजारा समाज शिक्षणात मागे आहे, शासकीय सेवेत त्यांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे, राजकीय क्षेत्रात त्यांचा आवाज दडपला गेला आहे. न्यायालयीन खटले, विविध आयोगांचे अहवाल आणि राज्य मंत्रिमंडळाचे ठराव यामध्ये वारंवार समाजाच्या मागणीची वैधता अधोरेखित झाली आहे. परंतु केंद्र सरकारकडून अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित आहे. "ज्यांना इतिहासाने वंचित केले, त्यांना भविष्याने न्याय द्यावा" हा विचार आता प्रत्यक्षात उतरवणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला ST दर्जा देणे म्हणजे फक्त आरक्षणाचा लाभ नव्हे, तर त्यांचा हरवलेला सामाजिक-सांस्कृतिक सन्मान परत मिळवून देणे आहे.

यामुळे आता धोरणकर्त्यांनी धाडसी निर्णय घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दर्जा द्यावा. हा निर्णय घेतल्यास समाजाला शिक्षण, रोजगार व राजकारणातील संधी समानतेने उपलब्ध होतील आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले जाईल.



**डॉ. चव्हाण दिलीप लालू**
**रूपचंद नगर,तालुका**
**रेनापुर,जिल्हा लातूर**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

चे बावनकुळे यांनी सांगितले. जरांगे यांनी कुणबी जातीचे प्रमाणपत्रे देण्याची मागणी केली आहे. असे असताना ओबीसी समितीत एकही कुणबी समाजाचा प्रतिनिधी नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. यावर बावनकुळे यांनी उपसमिती कॅबिनेट मंत्र्याची असल्याचे स्पष्ट केले. ओबीसीमध्ये 353 जाती आणि 12 बलुतेदार आहेत. ही समिती कुठल्या एका जातीची नाही. आम्ही सर्व एक आहोत आणि एकदिलाने ओबीसीच्या हितासाठी काम करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका सांगितली आहे. कुठल्याही समाजाचे आरक्षण काढून ते दुसऱ्या समाजाला दिले नाही. काही जण सामाजिक सलोखा बिघडवण्यासाठी संभ्रम निर्माण करीत आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये कुणबी-मराठा अशी नोंद असलेल्यांना जातीचे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. पुरावे असल्याशिवाय कोणालाही जात प्रमाणपत्र मिळणार नाही. याबाबत फार संभ्रम कोणी ठेवू नये अरे आवाहनही चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

--------------------------------------------

व्हिडीओ व्हायरल झाला आहे. अजित पवार आणि सोलापूरच्या माढा तालुक्याती डेप्युटी एसपी अंजली कृष्णा यांच्यात झालेली बातचीत व्हिडीओत कैद झाली असून तोच व्हिडीओ वाऱ्याच्या वेगाने सोशल मीडियावर पसरला आहे. या व्हिडिओमध्ये अजित पवार हे त्या महिला पोलिस अधिकाऱ्याला खडी उत्खनन तात्काळ थांबवण्यास सांगत आहेत. आदेशांचे पालन न केल्याबद्दल कारवाई करू असे ते धमकीच्या स्वरात बोलतानाही दिसले. 1 सप्टेंबरची ही घटना असल्याचे सांगितले जाते.खरंतर सोलापूरच्या माढा तालुक्यातील कुर्डू गावामध्ये मुरुम उपसा होत असल्याची तक्रार समोर आली. तहसील अधिकारी आणि डेप्युटी एसपी अंजली कृष्णा यांना ही तक्रार मिळताच, पोलील दल घेऊन त्या कारवाई करण्यासाठी तेथे पोहोचल्या. प्रशासनाची कारवाई सुरु असताना, राष्ट्रवादीचे स्थानिक कार्यकर्ता बाबा जगताप यांनी त्यांच्या फोनवरून थेट अजित पवारांना फोनल करत त्यांचं अधिकाऱ्याशी बोलणं करून दिलं. घटनास्थळी उपस्थित असलेल्या अंजली कृष्णा यांनी अजित पवारांशी संवाद साधला.त्या फोनवर अजित पवार म्हणाले की, मी उपमुख्यमंत्री अजित पवार बोलतोय, तुम्ही तुमची कारवाई थांबवा आणि तिथून निघून जा, असे आदेश त्यांनी दिले. उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः फोन केला होता असे तुम्ही तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला सांगा. मुंबईतील वातावरण खराब आहे आणि आपल्याला तिथे प्राधान्य द्यावे लागेल. मी तुम्हाला कारवाई तात्काळ थांबवण्याचा आदेश देतो, असे त्यांनी सांगितलं.मात्र त्या बोलण्यादरम्यान पोलिस उपअधीक्षक अंजना कृष्णा म्हणाल्या की मला कसं कळणार की तुम्हीच बोलत आहात. असं म्हणत त्यांनी अजित पवार यांना व्हिडिओ कॉल करून त्यांची ओळख पटवण्याची, पडताळणी करण्याची मगाणी केली. ते ऐकून अजित दादा भडकले. तुम्ही मला कॉल करायला सांगताय ? तुमच्यावर ॲक्शन घेईन अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.त्यावर अंजली कृष्णा म्हणाल्या की मी तुमचं बोलणं समजू कते. त्यानंतर अंजली यांनी नंबर दिल्यावर अजित पवार यांनी त्या नंबरवर व्हिडीओ कॉल केला. माझा चेहरा तर तुम्ही ओळखत असाल ना, तुमची डेअरिंग खूपच वाढली आहे,असंही अजिपवारांनी सुनावलं. फोनवर बोलताना अजित पवारांनी डेप्युटी एसपी अंजली कृष्णा यांना कारवाई थांबवून तेथून निघून जाण्यास सांगितलं.या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ समोर आला असून तो सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आहे.

--------------------------------------------

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी आदेश देताच शुक्रवारी (दि.5) सायंकाळी 6.30 च्या सुमारास एका मागोमाग पोलिस दंगल नियंत्रण पथक आणि गृह रक्षक दलांच्या जवान त्यांच्या वाहनातून सायरन वाजवीत बीड रोडने शारदा इंग्लिश स्कूलच्या दिशेने रवाना झाले. शारदा इंग्लिश स्कूलजवळ येताच सर्व पोलिसांनी पटापट गाडीतून उड्या मारल्या आणि धावपळ करीत ॲक्शन घेत पोझिशन घेतली. तेवढ्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना परिस्थितीचे ब्रिफिंग केले आणि पोलिस निरीक्षकांनी आदेश देताच दंगल नियंत्रण पथकाचे जवान यांनी हॅन्डग्रेड व अश्रुधुराचे नळकांडे काढून त्याचे हवेत फायर करायला सुरुवात केली.ही कारवाई सुरु असताना प्रत्यक्ष पाहणाऱ्या नागरिकांमध्ये उलट-सुलट चर्चा सुरु झाली. नेमका हा काय प्रकार आहे. याची कुणालाच कल्पना नव्हती. यामुळे प्रत्येकजण माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होता. आणि एक प्रकारचा तणाव आणि दबाव निर्माण झाल्याचे जाणवत असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी यांनी दिली. या सर्व प्रकाराची माहिती पत्रकारांना मिळाल्यानंतर पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानंतर शहरात काहीही घडलेले नसून हा पोलिसांचा सराव असल्याचे सांगण्यात आले. याची माहिती मिळताच नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

--------------------------------------------

,माजलगाव, बीड, आष्टी ,पाटोदा ,गेवराई ,धारूर, सोनपेठ, गंगाखेड, परभणी, हिंगोली ,नांदेड, लातुर ,औरंगाबाद ,जालना, उस्मानाबाद , तुळजापूर, कोल्हापूर ,सोलापूर, पंढरपूर , आळंदी देवाची, सांगली, सातारा पुणे ,मुंबई, नागपूर ,नाशिक अमरावती, वर्धा, धुळे , यवतमाळ दिल्ली तिरुपती व अनेक राज्यांतुन सह महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्याभरातून मित्र परिवार व राज्याचे IAS ,IPS,CEO सर्व अधिकारी कर्मचारी महाराष्ट्र राज्याचे अनेक विभागाचे राज्यचे मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री ,खासदार ,आमदार , सचिव,संचालक, उपसचिव उपसंचालक आयुक्त, यांच्यासह त्रिपुरा सह देशभरातील आपल्या मित्र परिवाराकडून आज मा श्री किरण गित्ते IAS यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून मा श्री किरण गित्ते साहेब त्रिपुरा राज्याचे सचिव असून सुद्धा आपले महाराष्ट्र राज्यातील व जन्मभूमि तील मित्र परिवार नातेवाईक वरिष्ठ अधिकारी सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातून आज दिवसभर रात्री 12.00 वाजल्यापासून ते शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दरम्यान, आपल्या सर्वांच्या व्हाट्सअप, फेसबुक ,इंस्टाग्राम, मोबाईल, फोन ,प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष शुभेच्छांनी अक्षरशः भारावून गेलो असुन आपल्या शुभेच्छांमुळे अशीच मला शासकीय सेवेमध्ये काम करण्याची ऊर्जा मिळावी ही प्रभू वैद्यनाथाच्या चरणी प्रार्थना करतो असे उद्गार IAS किरण गित्ते यांनी काढले.

--------------------------------------------

नाही. परंतु या आदेशाने ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही, असे सांगत राज्यातील माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते (शरद पवार गट) हर्षवर्धन पाटील यांनी मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाला पवार कुटुंबीयांनी रसद पुरवण्यात आल्याच्या संदर्भाने करण्यात येणारी वक्तव्ये चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले. ते परळी येथे माध्यमांसमोर शुक्रवारी बोलत होते.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या बारामतीत शुक्रवारी काढलेल्या मोर्चावर पाटील म्हणाले, की लोकशाहीत कोणालाही मोर्चा काढण्याचा अधिकार आहे. जरांगे यांना शरद पवार कुटुंबीयांनी रसद पुरवल्याचा प्रा. हाके आरोप करत आहेत, त्यांनी तसे पुरावे द्यावेत. अजित पवार यांनी महिला पोलीस अधिकाऱ्याला धमकावल्याचे समोर आल्याकडे पाटील यांचे लक्ष वेधल्यानंतर ते म्हणाले, की याबाबतची सत्य परिस्थिती तपासून घेतली पाहिजे. अधिकाऱ्याचे ऐकून घेतले पाहिजे. राज्यकर्त्यांनी अशा प्रसंगाच्या वेळेला संयमाने घेतले पाहिजे.

--------------------------------------------

पर्यवेक्षक श्री.महादेव धायगुडे सर, परळी वैजनाथ येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीकारी श्री.चव्हाण सर व श्री. वैभव सर ईत्यादी मान्यवर मंचावर उपस्थितीत होते.

शाळेतील जेष्ठ सहशिक्षकांच्या हस्ते मंचावर उपस्थितीत सर्व मान्यवरांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री.प्रदिपजी खाडे साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालयाचे अधिकारी श्री.चव्हाण साहेब व श्री.वैभव साहेब यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.शाळेतील सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित सामुहिक गीत गायनाचा कार्यक्रम यावेळी संपन्न झाला. शाळेचे पर्यवेक्षक श्री.महादेव धायगुडे सर यांनी श्री. प्रदीपजी खाडे साहेब यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आलेख उपस्थित विद्यार्थ्यांसमोर आपल्या प्रास्ताविकातून रेखाटला.मान्यवरांच्या हस्ते विविध सहशालेय उपक्रमात यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच शाळेतील गरजू विद्यार्थ्यांस गणवेश वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप, क्रिकेट संघास खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले.

तत्पूर्वी सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री.कदरकर सर व उपस्थित शिक्षकांच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आली.नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री.प्रदीपजी खाडेसाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा केक शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते कापण्यात आला. याप्रसंगी मंचावर उपस्थितीत सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतात माननीय श्री. प्रदिपजी खाडेसाहेब यांना वाढदिवसानिमित्त मंगलमय शुभेच्छा व्यक्त केल्या व पुढील आयुष्य आरोग्यमय जाओ, सुखसमृद्धी लाभो अशा आशयाच्या सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाची सांगता अध्यक्षीय समारोपाने झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेष्ठ सहशिक्षिका सौ.कोम्मावार मॅडम यांनी केले. आभार प्रदर्शन संस्कृत विषय शिक्षक श्री.नितीन व्हावळे सर यांनी केले.

--------------------------------------------

माजी सभापती राजेसाहेब देशमुख, पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शहराध्यक्ष जीवनराव देशमुख, ज्येष्ठ नेते उत्तमराव माने, हनुमंत फड, रमेश ढाकणे, शंकर शेजुळ, राजेभाऊ दराडे, शिवाजीराव देशमुख, मंगलताई सोळंके, साहेदाबी, रेखा जानराव, फिरोज सय्यद, तौफिक कच्छी, डॉ.संदीपान काळे, अशोक जिजा कदम, शिवाजी लोमटे, अंकुश दराडे, शिवाजी नागरगोजे, अक्षय सोनवणे, ईश्वर आगलावे, सुभाष कराड, विजय चौरे, सुनील दौंड, फिरोज शेख, बब्रुवान आघाव, भीमराव हाके, विलास राठोड, समाधान मुंडे, दत्ता घोडके यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

--------------------------------------------

श्री पद्मावती शिक्षण संस्था) होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दीपकजी तांदळे साहेब (सचिव, श्री पद्मावती शिक्षण संस्था) उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे मार्गदर्शन करण्यासाठी प्र. मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते भारताचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आदर्श शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व शिक्षणमहर्षी कै.विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. त्यांच्या कार्याचा व विचारांचा स्मरण करून उपस्थितांनी शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “दरवर्षी 5 सप्टेंबरला आपण शिक्षक दिन साजरा करतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आयुष्यभर शिक्षण व संस्कार यांचा प्रसार केला. शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार आहे. तो कुंभाराप्रमाणे असतो – एका हाताने विद्यार्थीरूपी मडक्याला थापट्या मारतो, तर दुसऱ्या हाताने आतून आधार देतो. शिक्षकाचे हे कार्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा खरा पाया आहे.”

या कार्यक्रमात मुख्याध्यापक व इतर मान्यवरांनी शिक्षकांचे समाजातील स्थान, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडविण्यातील भूमिका, तसेच शिक्षकांशिवाय समाजाची प्रगती अपूर्ण आहे याबाबत विचार मांडले. त्यांनी शिक्षक म्हणजे फक्त ज्ञान देणारा नाही तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणारा, मार्गदर्शक आणि प्रेरणास्त्रोत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचा विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आयोजित भाषण स्पर्धा होती. विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी मंचावर येऊन शिक्षकांविषयी आपले विचार मांडले. लहानग्यांपासून मोठ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी आत्मविश्वासाने आपली भाषणे सादर केली. अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांना “खरे हिरो” संबोधले तर काहींनी त्यांना “आईवडिलांप्रमाणे दुसरे मार्गदर्शक” म्हटले. विद्यार्थ्यांच्या या भाषणांमध्ये कृतज्ञतेसोबतच शिक्षकांविषयीची अपार आदरभावना प्रकट झाली.

स्पर्धेनंतर विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. काही विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांना वंदन करत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. “गुरुवर्य, तुमच्या आशीर्वादाशिवाय आमचे आयुष्य अपूर्ण आहे,” अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सोळंके सर यांनी केले. त्यांनी कार्यक्रमात उत्साह निर्माण करत प्रत्येक सादरीकरण अधिक प्रभावी करून दाखवले. आभार श्री. सूर्यवंशी सर यांनी मानले.

शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली होती. संपूर्ण कार्यक्रमात एकात्मता, आदर आणि आनंद यांचे सुंदर दर्शन घडले.

शिक्षक दिनानिमित्त संस्कार प्राथमिक शाळेने दिलेला हा सुंदर अनुभव म्हणजे विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील नात्याचा सच्चा सण असल्याचे उपस्थितांनी मत व्यक्त केले.

--------------------------------------------

महसूल अधिकारी अभिजीत मधुकर दहीवाळ आणि महसुली सहाय्यक जयश्री नारायण वाका यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवरही अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली आहे.गेवराई तहसील कार्यालयातील एका महत्त्वाच्या प्रकरणाची माहिती ईडीपी प्रणालीवर अपलोड करताना झालेल्या त्रुटीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता ही जबाबदारी दहीवाळ यांच्यावर निश्चित करण्यात आली. याबाबत शासनाने थेट चौकशीचे आदेश देत संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली. चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात आले असून स्पष्टीकरण न आल्यास पुढील कारवाई अनिवार्य होणार.कर्तव्यावर असताना काही चुका कर्मचाऱ्यांकडून होऊ शकतात. त्यावर त्यांच्याकडून खुलासा घेणे गरजेचे असते. जर संबंधित कर्मचाऱ्याकडून समाधानकारक खुलासा आला नाही तर त्यावर कारवाई झाल्यास कोणाची तक्रार असण्याची तक्रार नाही.परंतु कर्मचाऱ्यांची बाजू ऐकून न घेताच किंवा किरकोळ चुकासाठी मोठी शिक्षा दिली जात असेल तर हे चुकीचे असल्याची भावना कर्मचाऱ्यांमधून व्यक्त केली जात असून या सर्व प्रकारच्या विरोधात कर्मचारी संघटना देखील आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे.जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या कारवाईमुळे महसूल विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मात्र, कारवाईमुळे विलंब न करता कामे वेळेत पूर्ण करण्याचा संदेश संपूर्ण विभागात पोहोचला आहे. सर्वसामान्य जनतेकडून या कारवाईचे स्वागत होत आहे, कारण यामुळे शासकीय कामकाजात शिस्त व गती येण्यास हातभार लागणार आहे.

--------------------------------------------

करण्यात आले. यात सोंड भारती व्दारकादास मुंदडा, हात डॉ. आर. जी. बजाज, कान सचिन व गिरीश बजाज, कंगन सचिन श्रीकांत रुद्रवार यांनी अर्पण केले, तर चांदीचे मोदक व दुर्वा देखील अर्पण करण्यात आले आहेत.

## पान 4 वरुन

सदस्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात शिक्षकेने दिलेल्या तक्रारीवरुन बलात्काराचा गुन्हा दाखल झाला. नारायण शिंदे असं माजी जिल्हा परिषद सदस्याचे नाव असून तो दोन्ही राष्ट्रवादीत सक्रिय कार्यकर्ता आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पीडीतेने दिलेल्या तक्रारीवरुन एप्रिल 2006 ते डिसेंबर 2022 या कालावधीत बीडसह इतर वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन नारायण शिंदे याने लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध ठेवून फ्लॅटसाठी आणि इतर कामासाठी पैसे मागितले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. याच तक्रारीवरुन नारायण शिंदे याच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कलम 376, 376 (2) (एन), 406, 506 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करतायत.

--------------------------------------------

सोपान येवले, होमगार्ड तुषार वामन यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. दरम्यान, आज सकाळी शोकाकुल वातावरणात घाटपिंपरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. बीड ते अहिल्यानगर राज्य महामार्गावरील धामणगांव ते घाटपिंपरी या रोडलगत महावितरणे गुत्तेदाराच्या माध्यमातून नियमबाह्य विद्युत खांब उभारले आहेत. अगदी रोडच्या साईट पट्याला लागूनच हे खांब असल्याने यावर दुचाकी आदळली. गुत्तेदारांने नियमानुसार काही अंतर सोडून जर विद्युत खांब उभे केले असते तर हा बळी गेला नसता, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

--------------------------------------------

कोष्टी गणेश मंडळ सामाजिक जाणिवेतून विविध उपक्रम राबवत असून, या शिबिराला पांडुरंग जुजगर यांचे मार्गदर्शन लाभल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. सर्व रक्तदाते व सहकार्य करणाऱ्यांचे विशेष आभार पांडुरंग जुजगर यांनी मानले.

--------------------------------------------

झाला आहे. आता प्रशासनाने तात्काळ कडक कारवाई केली नाही, तर बालाघाटाचा फक्त इतिहासच उरेल, भूगोल नाही, असा सूर उमटू लागला आहे.

--------------------------------------------

परिस्थितीचा गैरफायदा घेतला. त्याने पीडितेला मानसिक आधार देण्याच्या बहाण्याने तिच्यावर अत्याचार केले. तसेच, पुण्यात फ्लॅट आणि मुलांना नोकरीचे आमिष दाखवून वेगवेगळ्या वेळी तिच्याकडून 1 कोटी 10 लाख रुपये घेतले. पीडितेने नंतर पैसे परत मागितल्यावर शिंदेने तिला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. “वाहनाखाली चिरडून टाकीन,” “खोट्या गुन्ह्यात अडकवेन” आणि “माझ्या ओळखी खूप वरपर्यंत आहेत,” अशा धमक्या त्याने दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या त्रासाला कंटाळून पीडितेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

--------------------------------------------

परवेज कुरेशी, तालुका अध्यक्ष गणेश बजगुगे मोहिबुउर रहमान, सय्यद फरान, रईस शेख, फिरोज शेख आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी, शहराध्यक्ष परवेज कुरेशी यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट केले आणि सांगितले की, “रक्त निर्माण करता येत नाही, त्यामुळे दातेच पुढे यायला हवेत.” त्यांनी या उपक्रमाचे कौतुकही केले आणि असे उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात बालेपिर भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

--------------------------------------------

सौ. अंजली भन्साळी, सौ. सुजाता मुंदडा तसेच सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुधाताई गुट्टे, सौ. सोनाली फड, सौ. प्रियंका जोशी, सौ. मेनका बळवंत आदींच्या हस्ते आज आरती करण्यात आली.

यावेळी इंटकचे महासचिव दत्तात्रय गुट्टे, जेष्ठ पत्रकार प्रा. रविंद्र जोशी, ज्ञानोबा सुरवसे यांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रतिक्स मेकअपचे संचालक, प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट प्रतिक सुरवसे, श्रीमती कमलबाई पतंगे, ऐश्वर्या ब्युटी पार्लरच्या संचालिका सौ. प्रतिभा सुरवसे, सौ. श्रीकंवर बळवंत यांनी स्वागत केले.

--------------------------------------------

बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती. हे स्थळ बौद्धांसाठी जगातील सर्वात पवित्र स्थळ असून, त्याचा ताबा बौद्धांनाच असायला हवा. परंतु सध्या हा ताबा हिंदू ब्राह्मणांकडे आहे. विहाराचा ताबा बौद्धांना मिळावा या मागणीसाठी धम्मध्वज रॅली काढण्यात आली आहे.”

भन्ते विनाचार्य यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली निघाली असून, त्यात भिक्खु संघासह सुमारे शेकडो उपासक- उपासिका सहभागी झाले आहेत. बीडमध्ये या रॅलीचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात येणार असून, बौद्ध अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीकडून करण्यात आले आहे.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून सामाजिक न्याय भवनापर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, शेवटी सभा पार पडणार आहे. या सभेत विविध वक्ते मार्गदर्शन करणार असून, बीड जिल्ह्यातील बौद्ध अनुयायांना या आंदोलनाचे महत्व समजावून सांगितले जाणार आहे. त्यामुळे बौद्ध उपासक -उपासिकांनी या रॅलीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भिक्खु धम्मशिल थेरो यांनी सर्व केले आहे.

--------------------------------------------

आहे तशीच परिस्थिती महाराष्ट्रातील बंजारा समाजाची किंबहुना त्या पेक्षा हलाखीची परिस्थिती आहे.

देशातील बंजारा समाजाची एकच बोलीभाषा, एकच पेहराव आणि एकच संस्कृती असताना सुद्धा वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळं आरक्षण दिले गेले आहे त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजावर सरळ सरळ अन्याय आहे.

हैद्राबाद गॅझेट मध्ये बंजारा समाजाच्या सामाजिक मागासलेपणाचा,बोली भाषा, संस्कृती आणि भौगोलिक बाबींचा उल्लेख केला गेला आहे त्यामुळे राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट तात्काळ लागू करुन मराठवाड्यातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी बंजारा व्यापक आंदोलन छेडणार आहे असे सचीन राठोड यांनी म्हटले आहे.

--------------------------------------------

शाखाधिकारी उमाकांत काळे साहेब,गजानन हालगे आदर्श शिक्षक अशोक नावंदे,सोमनाथ गोपनपाळे सर,मनोज चौंडे सर,राजेश साखरे सर,सुरेश कराड आर,संदीप नीला सर ,पालक संदीप तिळकरी सर,दत्ताभाऊ गोपानपाळे, विशाल बुद्रे कर्मचारी अमोल नखाते, सुरज बेंबळगे, संदीप गित्ते उपस्थित होते.आज शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या हस्ते हा सत्कार झाल्याचा आनंद यावेळी पालकांनी व्यक्त केला.

--------------------------------------------

महत्त्वाच्या नोंदी करून किती लोक शासनाच्या योजना पासून अपेक्षित वंचित राहिलेले आहेत याची माहिती संकलन करून शासन दरबारी सादर करणार आहे व वंचित असलेल्या लोकांपर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहचवण्यासाठी ही समिती काम करणार आहे

एकलव्य सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री युवराज बर्डे तसेच संस्थेच्या उपाध्यक्षा सौ सारिका बर्डे यांच्या अनुमतीने ही जिल्हास्तरीय समितीचे जिल्हाध्यक्ष पदी भारत बर्डे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली

यावेळी डॉ.आकाश पवार, समाजसेवक दीपक बर्डे,विजू पवार, कल्याण बर्डे, सदाशिव पवार, पै.माऊली दादा शिंदे, दत्ता भाऊराव गायकवाड,अशोक पवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

--------------------------------------------

त्या चिमुकली साठी जी मदत फेरी काढली होती,तो उपक्रम अतिशय स्तुत्य असून शहरातील सर्व युवकांनी त्यांचा आदर्श घ्यावा या प्रकारची भावना डॉ गुरुप्रसाद देशपांडे यांनी व्यक्त केली.

--------------------------------------------

मुख्याध्यापक व प्राचार्य मुरलीधर बोराडे, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ( मुलांची) परळी येथील दत्तात्रय गंगाधर गायकवाड, सय्यद अब्दुल गणी जवाद अली, मुख्याध्यापक,मिल्लीया माध्यमिक शाळा,परळी वैजनाथ,विद्यावर्धिनी विद्यालयाच्या सहशिक्षिका सौ.सिंमींता शंकरराव सिरसाट(कांदे), जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,बेलंबा येथील सहशिक्षिका सौ.कल्पना रामचंद्र मारमवार( कोम्मावार) यांचा शिक्षक गौरव पुरस्कारांमध्ये समावेश आहे.

नोव्हेंबरमध्ये परळी येथे 7 वे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन होणार आहे. या संमेलनात मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य संयोजक रानबा गायकवाड व संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

--------------------------------------------

महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.गणेशोत्सवाच्या निमित्ताने झालेल्या या आरती व कीर्तन सोहळ्याला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. यावेळी नेते निळकंठ चाटे,शिवाजी बडे आदी उपस्थित होते.

--------------------------------------------

# निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या चिंताजनक.

आंतरराष्ट्रीय गिधाड जागरूकता दिन, ज्याचा उद्देश गिधाडांच्या सर्व प्रजातींबद्दल जागरूकता निर्माण व्हावी व घटती संख्या या उद्देशाने 2009 मध्ये दक्षिण आफ्रिकेतील बर्ड्स ऑफ प्रे कार्यक्रम आणि युनायटेड किंग्डममधील हॉक कंझव्हन्सी ट्रस्ट सहकार्याने सुरुवात करतात आली. तेव्हापासुन निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या पहाता जगात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या शनिवारला आंतरराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, अणुचाचणी, दारूगोळा,वाढती युद्धजन्य परिस्थितीत व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश-पाताळ-पुर्व-पश्चिम -उत्तर- दक्षिण-पृथ्वी-निसर्ग पुर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येवुन ठेपली आहे.यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदुषण दिसून येते.याचाच परिणाम आज मानव, पशुपक्षी, जीवजंतू यांना भोगावा लागत आहे. आज वाढत्या प्रदूषणामुळे पक्षांना आकाशात उडतांना अनेक कठीणायीचा सामना करावा लागतो.जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे आणि आता निसर्गाला संतुलित ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते निसर्ग मित्र गिधाड यांनाच आज मृत्यूशी सामना करावा लागत आहे याला अत्यंत भयावह परिस्थिती म्हणावी लागेल. मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन सुरक्षित ठेवण्याचे काम मुख्यत्वेकरून गिधाडांचे आहे. त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावुन निसर्ग निरोगी ठेवुन पृथ्वीचे,मानवजातीचे व संपूर्ण जीवजंतूचे रक्षण गिधाड करायचे व करीत आहे.परंतु भारतासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील 90 टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते.यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे.गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम मानवजातीनेच केले आहे.भारतात 6 भारतीय व 3 स्थलांतरित अशा 9 प्रजातीच्या गिधाडांचे अस्तित्व आहे. 1980 च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या 40 दशलक्ष पेक्षा जास्त होती.मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या 15-20 वर्षात 90 टक्के गिधाडे संपली. काही प्रजातीतर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.जनावरांना दिली जाणारी डायक्लोफेनॅक औषध ही गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरायला लागली.त्यामुळे सरकारने 2006 मध्ये डायक्लोफेनॅक औषधीवर बंदी घातली.तरीही या औषधीचा वापर होत असल्याने 2015 मध्ये भारत सरकारने त्यांच्या उत्पादनावर पुर्णतः बंदी घातली.डायक्लोफेनॅकवर बंदी लावली असली तरी इतर नॉन-स्टेरॉइडल ॲंटी-इंफ्लेमेटरी ड्रग्सचा वापर जनावरांवर केला जातो आणि या औषधीचाही वापर गिधाडांसाठी तेवढ्याच धोकादायक आहे.म्हणजेच आपण जनावरांना जेही काही औषधे देतो ती संपूर्ण गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरत आहे. त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे.25-30 वर्षापुर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते. परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते.काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढवीण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होतांना दिसतो व होत आहे.परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे.कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर विषेली होतात.ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगुन मृत्यूशी झुंज द्यावी लागते. यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या 90 टक्याने घटल्याचे दिसून येते.ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे.एका माहितीनुसार 1993 ते 2007 दरम्यान भारतीय प्रजाती असलेल्या पांढऱ्या पुठ्याचे गिधाडांची संख्या 99.9 टक्के नष्ट झाली आहे.याशिवाय भारतीय गिधाड व निमुळत्या चोचीचे गिधाड या प्रजातींची 99 टक्के संख्या कमी झाली आहे. म्हणजेच निसर्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गिधाडांची संख्या कमी होने अत्यंत चिंताजनक बाब आहे. त्यामुळे गिधाडांच्या बहुतेक प्रजाती नामशेष होण्याची भीती पहाता; भारतीय निसर्ग मित्राला वाचविण्याची काळाची गरज आहे.2020 ते 2025 पर्यंतच्या भारतातील गिधाड संवर्धनाच्या कृती आराखड्यानुसार भारतीय गिधाड फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्र वनविभाग गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.ही अत्यंत आनंदाची बाब आहे याचे मी स्वागत करतो.आंतराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिनाचे औचित्य साधून निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेच सोबतच संपूर्ण राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातील वनविभागाने गिधाडांना वाचवीन्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व सोबतच प्रदूषणावर सुध्दा मात करण्यास आपल्याला यश प्राप्त होईल.जंगल सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित,निसर्ग सुरक्षित तर पशुपक्षी सुरक्षित, पशुपक्षी सुरक्षित तर आपण सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर**

हॅलो बीड
परळी
संघर्षनेता
शनिवार दि. 06 सप्टेंबर 2025


# बीड पुन्हा हादरलं! मेंढपाळ तरुणाची निघृणपणे हत्या; तीन दिवसातील दुसरी हत्येची घटना




: एका मेंढपाळ तरुणाच्या हत्येने बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला (Beed Crime) आहे. पाटोदा पोलीस ठाणे हद्दीतील दगडवाडी येथे पहाटेच्या सुमारास एका मेंढपाळ तरुणाची निघृणपणे हत्या (Crime) करण्यात आलीय. दीपक केरा बिल्ला असे मेंढपाळ तरुणाचे नाव असून हत्ये मागील कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांकडून (Beed Crime News) सध्या पंचनामा केला जातोय.

मिळालेल्या माहितीनुसार, घटनेतील मृतक दीपक बिल्ला हा मध्यप्रदेशातील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. उदरनिर्वाह करण्यासाठी तो मागील काही दिवसांपासून बीड जिल्ह्यामध्ये आला होता. शिरुर तालुक्यातील दगडवाडी परिसरात त्याचे वास्तव्य होते. आज पहाटे अज्ञातानी त्याची हत्या केल्याचं समोर आलंय. दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच एका तरुणाची हत्या झाली होती. ही घटना ताजी असतानाच आज पुन्हा एकदा मेंढपाळ तरुणाच्या हत्येने बीड हदरले आहे. तर जिल्ह्यात वारंवार सुरु असलेल्या खून, हाणामारी, आणि गुन्हेगारीच्या घटनेने पोलिसांसमोर आव्हान उभे केले आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न वारंवार घडत असलेल्या घटनेने ऐरणीवर आला आहे.बीडच्या माजी जिल्हा परिषद पान 3 वर

# गावाजवळच मृत्यूने गाठले!

## वळणावर दुचाकी विद्युत खांबाला धडकून तरुणाचा जागीच मृत्यू



बीड ): बीड ते अहिल्यानगर राज्य महामार्गावरील घाटपिंपरी येथे तरुणाचा दुचाकीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या विद्युत खांबावर दुचाकी धडकली. यात दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी रात्री 11 वाजेच्या दरम्यान घडली. राहूल अशोक कोकरे ( 26) असे मृत तरुणाचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील घाटपिंपरी येथील राहूल अशोक कोकरे ( 26) हा धामणगावहून गुरूवारी रात्री दुचाकीवरून गावाकडे निघाला होता. गावाजवळ येताच एका वळणार दुचाकीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या विद्युत खांबावर दुचाकी धडकली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. धामणगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ.पूजा रणवीर यांनी शवविच्छेदन केले. अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस फौजदार पान 3 वर

# रक्तदान हेच महादान" – पांडुरंग जुजगर

## कोष्टी गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान व आरोग्य शिबीर उत्साहात संपन्न



माजलगाव/ प्रतिनिधी जुजगर गल्ली, माजलगाव येथे कोष्टी गणेश मंडळाच्या वतीने गुरुवार, दि. 4 सप्टेंबर रोजी सामाजिक जाणीव ठेवून रक्तदान व आरोग्य शिबीर उत्साहात पार पडले. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात तब्बल 16 रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर शेकडो रुग्णांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

यावेळी मंडळाचे मार्गदर्शक पांडुरंग जुजगर म्हणाले की, "रक्तदान हेच महादान असून एका थेंबातूनही एखाद्याला नवजीवन मिळते. महाराष्ट्रात सध्या रक्ताची कमतरता जाणवत आहे, त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने रक्तदान करण्याची जाणीव ठेवली पाहिजे असे ते म्हणाले.

या शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवम तोष्णीवाल, डॉ. अंकित शिंदे, लॅब टेक्रीशियन दिनेश गिरी व प्रशांत धुमाळ यांनी सहकार्य केले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पान 3 वर

# बाळाघाटाचा अस्तित्व धोक्यात!

## » गौण खनिज माफियांचा धुडगूस – प्रशासन मूकदर्शक



बीड , :- जिल्ह्याला वेढून असलेल्या बालाघाट डोंगररांगा आज अस्तित्वाच्या संकटात सापडल्या आहेत. गौण खनिज माफियांनी अक्षरशः डोंगर पोखरून टाकले, तर प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून बसल्याची भावना जनतेत व्यक्त होत आहे.

मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त खनिज उपसा सुरु असून, अवैध उत्खननाचे थैमान दिवसेंदिवस वाढत आहे. जंगल, झाडी आणि डोंगररांगा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी, भूजलपातळी झपाट्याने खाली जात आहे, मातीची धूप वाढत आहे आणि भविष्यात बीड जिल्हा ओसाड व उजाड होईल, अशी गंभीर भीती निर्माण होत आहे.पर्यावरणप्रेमी व तज्ज्ञांचा इशारा जर बालाघाट वाचवले नाहीत, तर पुढच्या पिढ्यांना डोंगर, झाडं, निसर्ग यांची फक्त चित्रांतून ओळख करून द्यावी लागेल.जनतेच्या नजरेत प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. खनिज माफियांशी संगनमताचा संशय बळावत असून, पर्यावरण प्रेमी व नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण पान 3 वर

# आधाराच्या नावाखाली शिक्षिकेवर अत्याचार, 1 कोटीही लुटले; माजी ZP सदस्यावर गुन्हा



बीड : पतीने सोडल्यानंतर मानसिक आधार देण्याच्या बहाण्याने एका शिक्षिकेशी जवळीक साधून तिच्यावर 2006 ते 2022 या काळात वारंवार अत्याचार केला. एवढेच नव्हे तर मुलांना नोकरी लावतो आणि पुण्यात फ्लॅट घेऊन देतो, असे सांगून त्याने पीडितेकडून तब्बल 1 कोटी 10 लाख रुपये उकळले. याप्रकरणी नेकनूर जिल्हा परिषद गटाचा माजी सदस्य नारायण शिंदे याच्याविरोधात बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पीडित 51 वर्षीय महिला शिक्षिका आहे. 2006 मध्ये तिच्या पतीचे दुसऱ्या महिलेसोबत अनैतिक संबंध होते. त्यानंतर पतीने दोन मुलांना घेऊन घर सोडले. यामुळे पीडिता मानसिक तणावात होती. तिच्या पतीचा मित्र असलेल्या नारायण शिंदेने याच पान 3 वर

# ईद-ए-मिलाद उन-नबी निमित्त रक्तदान शिबीरास परवेज कुरेशी यांची भेट



बीड प्रतिनिधी* - ईद-ए-मिलाद उन-नबी च्या निमित्ताने बालेपिर येथे एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्याचा उद्देश "रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे" या संदेशाला प्रोत्साहन देणे होता. या शिबिरात असंख्य युवकांनी रक्तदान करून बीड शहराच्या रक्ताच्या तुटवड भासत आहे ही गोष्ट लक्षात ठेव रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

शिबिरास बीड जिल्हा अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे बीड शहर काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष पान 3 वर

# प्रतिक्स मेकअपच्या "श्रीं"ची सामाजिक क्षेत्रातील महिलांच्या हस्ते आरती

## गीता परिवारच्या सर्व सदस्या, सौ. सुधा गुट्टे, सौ. सोनाली फड, सौ. प्रियंका जोशी यांची उपस्थिती



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) शहरातील नामांकित "प्रतिक्स मेकअप" स्टुडिओतील स्थापित "श्रीं"ची आज विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या हस्ते आरती करण्यात आली. गीता परिवारच्या सर्व सदस्या, सौ. सुधाताई गुट्टे, सौ. सोनाली फड, सौ. प्रियंका जोशी आदी महिलांची उपस्थिती होती.

प्रतिक्स मेकअप स्टुडिओने अतिशय कमी वेळात नाव कमावले आहे. प्रेमपन्ना नगरमध्ये असलेल्या प्रतिक्स मेकअप स्टुडिओमध्ये "श्रीं"ची स्थापना करण्यात आली आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वेगवेळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या असून मान्यवर महिलांना या "श्रीं"च्या आरतीचा मान दिला जातो. आज शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर रोजी शहरात अतिशय चांगले संस्कार रुजवण्याचे काम करणाऱ्या गिता परिवारच्या सौ. ललिता जाजू, सौ. राधिका भुतडा, सौ. प्रिती तापडीया, सौ. सुनिता बंग, सौ. अर्चना इंदाणी, पान 3 वर

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी भिक्खु संघाची धम्मध्वज रॅली

## भिक्खु धम्मशिल थेरोंचे उपस्थित राहण्याचे आवाहन



बीड, प्रतिनिधी बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी काढण्यात आलेली धम्मध्वज रॅली आता बीडमध्ये दाखल होत आहे. नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीपासून सुरुवात झालेली ही रॅली मध्यप्रदेशातील सौंसरपर्यंत मार्गक्रमण करत असून, तिचा ठाणाव मंगळवार (दि. 9 सप्टेंबर) रोजी बीडमध्ये होणार आहे.

या संदर्भात शुक्रवार (दि. 5) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात महाबोधी महाविहार मुक्ती जिल्हा समितीची महत्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत रॅलीच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीत भिक्खु धम्मशिल थेरो यांनी सांगितले की, "महाबोधी महाविहार येथेच तथागत गौतम पान 3 वर

# राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा - सचिन राठोड गोर सेना प्रसिद्धी प्रमुख



वडवणी प्रतिनिधी हैद्राबाद गॅझेट लागु करून मराठवाड्यातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा सचीन राठोड यांनी दिला आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सचीन राठोड यांनी असे म्हटले आहे की, 1918 साली हैद्राबाद संस्थान अस्तित्वात असताना मराठवाडा आणि अन्य भाग हा हैद्राबाद संस्थानामध्ये समाविष्ट होता. हैद्राबाद संस्थानातील बंजारा समाज हा अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट आहे, तेलंगणा आणि कर्नाटक राज्यातील बंजारा समाज हा एस टी प्रवर्गात आहे आणि महाराष्ट्रात VJNT मध्ये अशा प्रकारचा भेदभाव केला गेला आहे.

तेलंगंना, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश मधील बंजारा समाजाची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व भौगोलिक वाईट परिस्थिती जशी पान 3 वर

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट शाखा परळी वैजनाथ व शंभु महादेव बचतगटच्या वतीने वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




परळी श्री मंगलनाथ मल्टीस्टेट शाखा परळी वैजनाथ व शंभु महादेव बचतगटच्या वतीने वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.*शहरातील वीरशैव समाजातील वैद्यकीय अभ्यासक्रमा करिता निवड झाल्याबद्दल चि आदर्श दत्तात्रय गोपनपळे एम आय टी वैद्यकीय महाविद्यालय लातूर, चि. सोहम विशाल बुद्रे बाळासाहेब ठाकरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई,कु.मधुरा संदीप तिळकरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा यांचा त्यांच्या घरी जाऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पान 3 वर

# एकलव्य सामाजिक व शैक्षणिक संस्थेची आदिवासी भिल्ल जमातीची विविध समस्यावर बैठक संपन्न



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) :- एकलव्य सामाजिक व शैक्षणिक संस्था गेल्या दहा वर्षापासून आदिवासी भिल्ल जमात व आदिवासींच्या विविध समस्यावर काम करत आहे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे, शिक्षणाचे महत्त्व समजून सांगणे रेशनकार्ड, आधार कार्ड जात प्रमाणपत्र वाटप करणे अनेक उपक्रम या संस्थेच्या अंतर्गत राबवण्यात आले आहेत आज या संस्थेच्या कार्यालय बीड येथे महत्त्वाची बैठक पार पडली या बैठकीच्या माध्यमातून जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली या जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून बीड जिल्ह्यामधील भिल्ल जमातीचा सर्वे करण्यात येणार आहे त्यासाठी ही समिती दारेदार जाऊन भिल्ल या जमातीच्या लोकांकडे आधार कार्ड रेशन कार्ड मतदान कार्ड जात प्रमाणपत्र आहे का नाही व शासनाच्या विविध योजना पासून काही लाभ झालेला आहे का अशा प्रकारच्या पान 3 वर

# चिमुकली साठी डॉ गुरुप्रसाद देशपांडे स्वत :च्या वाढदिवसाच्या निमित्ताने 21 हजार रुपयांची थेट मदत



परळी वै.मागील आठवड्यात शहराला काळिमा फासणारी घटना शहरात घडली होती,ऐका नराधमांने ऐका चार वर्षीय चिमुकल्या मुलीवर जो पाशवी बलात्कार झाला होता,त्या विरोधात सर्व शहरात प्रक्षुब्ध वातावरण निर्माण झाले होते,त्यामुळे शहरातील काही युवकांनी एकत्रितपणे येऊन चिमुकली साठी मदत फेरी काढली होती, त्यास अनेकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, याच अनुषंगाने शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ गुरुप्रसाद देशपांडे यांनी स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एक दिवसाची रुग्णसेवा निधी त्या चिमुकली च्या कुटुंबायांना आर्थिक मदत एकेविस हजार रुपये दिली. डॉ गुरुप्रसाद देशपांडे हे वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त देखील असून यापूर्वीही त्यांनी अनेक सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबविले आहेत,त्यामुळे संपूर्ण शहरातील सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या बद्धल अतिशय जिव्हाळा आहे,शहरातील युवकांनी पान 3 वर

# साप्ताहिक शिक्षण मार्गचे शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर, शिक्षक साहित्य संमेलनात होणार वितरण



परळी प्रतिनिधी. साप्ताहिक शिक्षण मार्गच्या वतीने दिले जाणारे शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले असून परळी येथे नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या 7 व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

पुरस्कार प्राप्त शिक्षकांमध्ये परळी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील केंद्रप्रमुख भा.प.चेनलवाड, परळी येथील माध्यमिक आश्रमशाळा येथील चित्रकला शिक्षक गंगाधर क्षीरसागर, शिवछत्रपती विद्यालय,परळी येथील शिक्षक अशोक फड, माजलगाव सादोळा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख नवनाथ गोरख शिनगारे,मोहा तालुका परळी येथील महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे पान 3 वर

# अॅड. मनोज संकाये यांच्या हस्ते शिवाजीनगर गणेश मंडळाच्या श्रीची आरती!



परळी वैजनाथ प्रतिनिधी शिवाजीनगर गणेश मंडळात गणरायाची आरती व कीर्तन सोहळा उत्साहात संपन्न झाला

शिवाजीनगर गणेश मंडळाच्या गणरायाची आरती यंदाही दरवर्षीप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते अॅड. मनोज संकाये यांच्या हस्ते पार पडली. या प्रसंगी मंडळाच्या वतीने ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यथाविधी आरतीनंतर ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे यांचे भक्तिप्रधान कीर्तन रंगले. कीर्तन संपल्यानंतर मंडळाच्या वतीने पान 3 वर